REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# "दक्षिण आशियाचे बदलते स्वरुप आणि भारताची सुरक्षा"

**प्रा. डॉ. एन. झेड. पाटील**
संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख, के.एन.बी. कला महाविद्यालय, नवलनगर, ता.जि. धुळे.

## प्रस्तावना :-



राष्ट्रीय अखंडता, सार्वभौमत्व, नीती मुल्यांचे सरंक्षण व बाह्य आक्रमणांचा प्रभावी प्रतिकार हे प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य ध्येय असते. प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घेणाऱ्या सामाईक, आर्थिक, राजनैतिक तसेच भू-राजनैतिक बदलांच्या संदर्भात सर्व राष्ट्रांना आपल्या राष्ट्रातील हिताच्या निर्धारण व निरंतर त्यांच्या पूर्तीसाठी आपल्या धोरणात संशोधन तसेच परिवर्तन करत राहणे आवश्यक असते. २० व्या शतकाच्या शेवटच्या दशकात सोव्हिएत संघाचे विघटन एक अशी आंतरराष्ट्रीय घटना आहे की ज्यामुळे आंतरराष्ट्रीय सुरक्षा समीकरण तसेच जगात शक्तीच्या राजकारणावर व्यापक प्रभाव पडत आहे.

नवीन आंतरराष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेच्या वर्तमान स्थितीकडे पाहण्यापूर्वी व्दिध्रुविय व्यवस्थेची समाप्ती तसेच सोव्हिएत विघटनाचा उल्लेख गरजेचा आहे. विघटना नंतर संतुलनाचे तागडे एका पक्षाकडे (अमेरिकेकडे) झुकले. परंतु आंतरराष्ट्रीय शांती तसेच सुरक्षेच्या स्थापने विषयीचे प्रयत्न नेहमी विरोधाभाषी राहिलेले दिसतात. शीतयुध्द काळात दोन्ही सैन्य संघटना वार्सा करार तसेच नाटो जे सुरक्षेसाठी बनवले गेले होते. त्यांनी आंतरराष्ट्रीय शांती स्थापनेत व त्यांच्या विकासात कोणतेही योगदान दिले नाही. अमेरिकेला चिंता आहे की, भविष्यात रशिया त्यांना आव्हान देऊ शकतो. जपानची आर्थिक शक्ती, जर्मनीचे एकीकरण तसेच चीन व भारताची वाढत असलेली आर्थिक व सामाजिक शक्ती यामुळे अमेरिका सर्वाधिक चिंतीत आहे शीत युध्दाच्या समाप्तीचे फळ स्वरुप आंतरराष्ट्रीय शांती आणि सुरक्षेच्या समोर नविन आव्हाने निर्माण झालेली आहेत. त्याचबरोबर प्रादेशिक संघर्षांना प्रोत्साहन मिळाले आहे.

दहशतवाद संदर्भात अमेरिकेच्या भेदभावपूर्ण भूमिकेमुळे अमेरिका एकीकडे अफगणिस्तानात तालिबानच्या निर्मुलनासाठी सुरु असलेल्या आपल्या सैनिकी कार्यवाहीला न्यायोचित आणि पाकिस्तान कडून भारताविरुध्द सुरु असलेल्या दहशतवादाविषयी भारताला धैर्याने काम करायचे सांगत आहे. या गोष्टीचे ठोस पुरावे आहेत की पाकीस्तान दक्षिण आशियातील दहशतवादाचा मुख्य स्त्रोत आहे. ११ सप्टेंबर २००१ च्या वर्ल्ड ट्रेड सेंटर वर केलेल्या दहशतवादी हल्लानंतर आंतरराष्ट्रीय सुरक्षा समिकरण त्वरीत बदलेले दिसून येते.

## नवीन आंतरराष्ट्रीय सुरक्षा संदर्भात :

भारताच्या भू-सामरिक तसेच भू-राजनीतिक स्थितीचा प्रश्न फारच महत्वपूर्ण आहे. भारताची स्थिती पूर्णपणे त्रिभूजाकार नसून ती चतुष्कोणिय आहे. भारताच्या दक्षिण भागाला सोडून बऱ्याच अंशी भारतीय सीमा सुरक्षित आहे. वास्तविक भारत पुर्वेपासून पश्चिमेकडे २९३३ कि.मी. आणि उत्तर ते दक्षिण ३२१४ किमी लांबी व रुंदी एवढा विस्तारलेला आहे. तसेच भारताची भू.सीमा व सागरी सीमा अनुक्रमे १५२०० व ६०८३ किमी एवढी आहे. भारताचे एकूण क्षेत्रफळ ३२८०४८३ वर्ग कि.मी. आहे. एवढे असून भारत जगातील सातव्या क्रमांकाचा मोठा देश आहे.

भारत चारही दिशांना अशा देशांनी घेरला आहे जे आज राजकीय अस्थिरता आणि सैनिकी दृष्टीकोणाचे केंद्र बनले आहेत. उत्तरेत हिमालय भारताला सिकियांग व तिबेट पासून

विलग करत आहे. पूर्वेस बांगलादेश तर पश्चिमेस पाकिस्तान व दक्षिणेस श्रीलंका हे राष्ट्र आहे. हे सर्व देश वर्तमान दक्षिण आशिया क्षेत्रात महाशक्तीचा विषेश करुन अमेरिका व चीन यांच्या आवडीचे ठिकाण आहेत. युरोप व आशियाच्या भू सामरिक व भू राजकिय दृष्टीने भारताची मध्यवर्ती स्थिती भविष्यात निर्णायक भुमिका पार पाडू शकते त्याचे कारण शक्यतोवर मॅकेंडरचा मर्मभूमी सिध्दांत होऊ शकतो त्यात त्याने पृथ्वीला एका किल्ल्याची उपाधी दिली आहे ही अतिशयोक्ती होणार नाही की, भारत आपल्या स्थितीमुळे जगाच्या सांग्रमिकतेवर नियंत्रण प्राप्त करु शकतो.

## भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आधार :

अलिप्तता हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आधार असल्यामुळे साम्यवादी व साम्राज्यवादी गटामध्ये संतुलन कायम ठेऊन आहे. परंतू भारताचे शेजारी मात्र भारताचे शत्रू आहेत भारताच्या पश्चिम सीमेवर स्थित पाकिस्तान बरोबर भारताचा चार वेळा सशस्त्र संघर्ष झालेला आहे. आज देखील पाक-भारत बरोबर शत्रूत्वाने वागत आहे. उत्तरेस चीन ने आपल्या विस्तारवादी धोरणामुहे १९६२ मध्ये भारतावर आक्रमण करुन चुकला आहे. आज देखील उभय देश सीमा समस्या सोडवू शकलेले नाहीत. बांगलादेश, नेपाळ व श्रीलंके बरोबर भारताचे संबंध मैत्रीपूर्ण नाहीत तर दुसरीकडे रशियाच्या विघटनामुळे हिंदी महासागरात जी एक सत्तेची पोकळी निर्माण झालेली आहे तीचा फायदा चीन घेऊ पाहत आहे.

भारतासमोर चीन व पाकिस्तान या दोन देशांकडून प्रत्यक्ष धोके आहेत हे दोन्ही देश भू मार्गे भारताच्या एकता व अखंडतेला आव्हान देण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याचबरोबर सागरी सीमेच्या बाबतीत भारताच्या सुरक्षेपुढे अनेक प्रकारचे आव्हाने आहेत. चीन व पाकिस्तान हे असे बाध्य धोके आहेत जे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रुपाने भारतीय अंखडतेपुढे आव्हाने निर्माण करीत आहेत.

## अमेरिकेची दक्षिण आशियातील कुटनीती :

अमेरिका दक्षिण आशियात आपल्या हिताच्या पूर्तीसाठी या क्षेत्रात कुटनीतीक सैनिकी कारवाया विशेष करुन भारताच्या सुरक्षेपुढे गंभीर आव्हाने निर्माण करत आहेत. पाकिस्तानला शस्त्रास्त्र तसेच दहशतवादासारख्या ज्वलंत मुद्यांवर अमेरिकाकडून सतत मदत मिळत आहे. अमेरिकेकडून पाकिस्तानात दिले जात असलेले अनैतिक व अंध समर्थन चीन व पाकिस्तान यांच्यात स्थापित आण्विक संबंध तसेच मध्य पूर्व क्षेत्रातील इस्त्रायलला शक्तीशाली बनविणे तसेच इराणला अमेरिकेकडून दिली जाणारी आक्रमणाची धमकी यामुळे असे ध्वनीत होत आहे की, आंतरराष्ट्रीय सुरक्षेच्या नावाने केले जात असलेले अमेरिकी प्रयत्न विश्व शांतीसाठी कदापी शुभ नाहीत. आण्विक शस्त्रात्र प्रसारात पाकिस्तानचे वैज्ञानिक डॉ. अब्दुल कादिर खानच्या स्पष्ट भूमिकेनंतर देखील अमेरिकेच्या चुप्पीमुळे 'आण्विक दहशतवाद' (Nuclear Terrorism) ला प्रोत्साहन मिळण्याची जास्त शक्यता आहे. काश्मिर, चेचण्या व कोसोवा इत्यादी ठिकाणी सुरु असलेल्या इस्लामिक दहशतवाद तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर हळूहळू मुस्लीम व इसाई यांच्यात वाढत असलेला वर्ग संघर्ष नविन आंतराष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेसमोर गंभीर आव्हान आहे.

भारत हे जागातील एकमेव सर्वाधिक दहशत वादाचे पिडीत राष्ट्र आहे. दहशतवाद भारताच्या सुरक्षेला सतत जटील बनवतांना दिसत आहे. भारताचा आण्विक कार्यक्रम तसेच चीन व अमेरिका यांच्यातील भावी जागतिक नेतृत्वाबाबतचा प्रश्न जगाला एका वेगळया संकटाकडे नेतांना दिसून येत आहे.

भारत जरी आण्विक शस्त्रास्त्रांनी सुसज्जीत आहे तरी आपल्या शेजाऱ्यांन बरोबर व्दिपक्षिय मतभेद भारतीय सुरक्षा तसेच विकासात अवरोधाचे काम करत आहेत. पाक अमेरिका व चीन पाक यांच्यात असलेली मैत्री भारतासाठी द्वीधा परिस्थिती निर्माण करत आहे.

## जागतिक नविन सुरक्षा प्रणालीचे स्वरुप :

अजूनही नविन जागतिक सुरक्षा प्रणालीचे स्वरुप स्पष्ट झालेले दिसत नाही. तरी देखील अमेरिकेचे वाढते वर्चस्व तसेच त्यांची उदंडता चिंताजनक आहे. रशिया, चीन, फ्रान्स, जर्मनी व जपान या सारख्या शक्तीशाली देशांची भूमिका नवीन सुरक्षा प्रणाली निर्धारणात निर्णायक असेल तरच भारत-चीन रशियाचा संभाव्य सामरिक त्रिकोण हा देखिल एक महत्वाचा भाग आहे. जो आंतराष्ट्रीय शांती सुरक्षा तसेच स्थिरतेला नविन आकार देवू शकतो. प्रत्यक्ष शस्त्रास्त्र संघर्षा व्यतिरिक्त पाकिस्तान भारताच्या विरुध्द जम्मू-काश्मिर राज्यात 'न्यून तीव्र संघर्ष' (LIC) संचालित करत आहे. दक्षिण आशियात दहशतवादाचा हा स्त्रोत (पाकिस्तान) न केवळ भारतासठी परंतु आंतरराष्ट्रीय समूदायासाठी चिंतेचा विषय आहे. अफगणिस्तानात तालिबानला आश्रय तसेच सुदान, लिबिया इत्यादी देशांच्या दहशतवादयांन बरोबर 'अल कायदा' संघटनेला पाकिस्तानने सर्व सुविधा उपलब्ध करुन देवून या क्षेत्रात एक अशी पृष्ठभूमि तयार करुन दिली आहे जी वर्तमान

तसेच भविष्यकाळात दोहोंमध्ये आव्हाने निर्माण करत राहतील. चीनचा मित्र असून देखिल पाकिस्तानच्या भूमिवरुन चीनच्या सिकियांग प्रातांत इस्लामिक दहशवादास प्रोत्साहन मिळत आहे.

## पाकिस्तानचा अमेरिकेकडून माध्यम म्हणून उपयोग :

अमेरिकेने पाकिस्तानला माध्यम बनवून अफगाणिस्तान संदर्भात जी सक्रियता दाखविली आहे त्यामुळेच शेवटी रशियाचा विघटनाचा मार्ग प्रशस्त झाला होता. अफगाण मुजाहिद्दीनच्या दहशतवाद्यांना पाकिस्तानच्या माध्यमाने अमेरिकेकडून पाठविल्या गेलेल्या आधुनिक शस्त्रास्त्रामुळे या क्षेत्रात अशी सामरिक स्थिती निर्माण केली आहे जी आज स्वत: अमेरिकेसाठीदेखील आव्हान ठरत आहे. ओसामा-बिन-लादेन याला स्वत: अमेरिकेने अफगान युध्दात रशिया विरुध्द उपयोगात आणले होते. त्यानेच अमेरिकेला मोठे आव्हान निर्माण केले होते.

११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेच्या पेंटॅगॉन तसेच वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील हल्ल्यानंतर अमेरिकेच्या धोरणात परिवर्तन आणले आहे. तसेच दहशतवादास नष्ट करण्यासाठी पुन्हा त्यालाच मित्र बनवून घेतले होते. वास्तविक अमेरिकेची सामरिक तसेच राजनैतिक विवशता तसेच आंतरराष्ट्रीय दहशतवादाला नष्ट करण्यासाठी उपयोगात आणले जात असलेले उपाय वैश्वीक शांतीसाठी गंभीर आव्हान आहे.

## निष्कर्ष :

आजच्या नविन जागतिक संदर्भात सोव्हिएत रशियाच्या विघटनामुळे निर्माण झालेल्या पोकळीमुळे चीन तसेच अमेरिका भावी भूमिकेच्या बाबतीत समोरा समोर आहेत. सोव्हिएत संघाच्या विघटनानंतर त्याच्या खऱ्या मित्राच्या विघटनामुळे नविन सुरक्षा आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. त्याचे समाधान करण्यासाठी भारत आर्थिक, राजनैतिक तसेच सैनिकी दृष्टीने योग्य पाऊले उचलत आहे. भारत नकेवळ शेजारी राष्ट्रांच्या बाहय दबावाचा प्रतिकार करत आहे. तर अंतर्गत कारणांनी निर्माण होत असलेल्या विविध नकारात्मक तत्वांना ओळखून समृध्दी तसेच विकासाच्या दिशेने अग्रेसर होण्याच्या बाबतीत आत्म निर्भरता, आण्विक शस्त्रास्त्र निर्मिती, आपल्या सर्व शेजाऱ्यांशी मैत्रीपूर्ण संबंधासाठी प्रयत्न तसेच स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचे पालन करत अमेरिके बरोबर संबंधाचे पुनर्निर्धारण या बाबतीत नेहमीच उल्लेखनीय आहे.

अमेरिका, रशिया, चीन, भारत व जपान व युरोपिय समुदाय संभावित भावी शक्तींची केंद्रे आहेत. आशियाचे नेतृत्त्व प्राप्त करण्यासाठी सुरु असलेल्या चीन-भारत स्पर्धेचा हा परिणाम आहे की चीन भारताची 'लुक इस्ट नीती' ( Look East Policy) बाबतीत गंभीर पाऊले उचलले जात आहेत. म्यानमार मध्ये देखिल चीन-भारत यांच्यात स्पर्धा सुरु आहे. 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' नीतीच्या माध्यमाने चीन-भारताची सामरिक घेरेबंदीसाठी तत्पर आहे. तसेच चीन-भारत, अमेरिका, जपान ऑस्ट्रेलिया यांच्यात उत्पन्न सदभाव व मैत्रीपूर्ण नीती बाबत शांशक आहे. मोदी सरकार नंतर भारत-अमेरिकेच्या रणनीतीक जवळीकतेमुळे चीन-भारतला दक्षिण आशियात व्यक्त ठेवून भारताच्या विस्तृत होत असलेल्या सुरक्षा क्षितीजाला निष्प्रभावी बनविण्याकरिता तत्पर आहे. वरिल सर्व संदर्भ बिंदू वर्तमानात भारताच्या सुरक्षा धोरणाची प्राथमिकता आहे. ज्यावर भारताला केंद्रीत ठेवून धोरण निर्धारण करणे फारच गरजेचे आहे.

## संदर्भ :

1- Dr. Hari Mohan Saxena : Political Geography
2- Civil Services times, Dec 2006
3- Sir Halford Mackinder : Democratic Idea,s and relatives, 1919, p.18
4- The Keysone of the Arch of the Indian Ocean o H K spate, India & Pakistan 1947, p.4
5- G.B. Asia : Land and peoples 1863, p.396
6- Civil Services Times, Dec-2006
7- Ibid
8- K.M. Pannikan : Geographical factors in Indian History, p.57
9- L. Dubey stamp, Asia : A Regional and Economics Geography, Landon 1959, p.279
10- Keith B Collard : Pakistan - A Political Study London, 1967, p. 11
11- G.W. Chaudhary : Pakistan,s Relation with India Meerut, 1971, p.185
12- लष्करी भूगोल, ए.पी. चौधरी
13- Captain Eden : Vansittart Notes on Nepal 1896, p.1



प्रा. डॉ. एन. झेड. पाटील
संशोधन मार्गदर्शक व विभाग प्रमुख, के.एन.बी. कला महाविद्यालय, नवलनगर, ता.जि. धुळे.

LBP PUBLICATION